माहितीच्या अधिकार

येरवडा-कळस-धानोरी क्षेत्रीय कार्यालय,
पुणे महानगरपालिका
पत्ता-सरगम हॉटेल समोर, गुंजन चौक येरवडा,
पुणे ४११००६.
दुरध्वनी क्र.०२०२५५०९१००/९१०८/९१०९
ई.मेल :- yerwada@punecorporation.org
जा.क्र.- ८६६५ दिनांक:- २/३/२६

**अपील अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय**

**प्रथम अपील क्रमांक :- ०१/२०२६**

प्रती,
**अ‍ॅड.ऋषिकेश प्रकाश गुंजाळ**
मयूर किलबिल सोसायटी,फ्लॅटन.C-7,104
धानोरी ,पुणे -४११०१५
मो नं :- ८७५९३३३८८८

**अपिलार्थी**

**विरुद्ध**

**जनमाहिती अधिकारी तथा क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक**
**अतिक्रमण विभाग**
येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका

---

<u>माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपील</u>

**अ‍ॅड.ऋषिकेश प्रकाश गुंजाळ** (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील), मयूर किलबिल सोसायटी,फ्लॅटन.C-7,104 धानोरी ,पुणे -४११०१५ यांचा माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत केलेला प्रथम अपील अर्ज, आ. क्र. ११४०५ दि.२७/०१/२०२६ ने रोजी येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालयास प्राप्त झाला.

जनमाहिती अधिकारी तथा क्षेत्रीय अतिक्रमण अधिकारी यांनी मूळ माहिती अधिकार अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा तपशील

| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झालेचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविण्याचा दिनांक | विलंब दिवस |
|---|---|---|---|---|
| २८/११/२०२५ | २८/११/२०२५ | २८/१२/२०२५ | जा.क्र.६४८३ दि. २४/१२/२०२५ | - |

अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्रथम अपील दाखल केले.

| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपील दाखल करावयाचा अंतिम दिनांक | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | अपिलाच्या विलंबबाबत निवेदन दिले आहे का ? |
|---|---|---|---|---|
| २७/०१/२०२६ | २७/०१/२०२६ | २८/०१/२०२६ | होय | - |

## विवेचन

अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५, कलम ६(१) अन्वये , धानोरी येथे रस्त्यावर लावलेल्या हातगाड्या बाबत माहिती मिळणेविषयी दाखल केलेला मूळ अर्ज या कार्यालयाकडे आ.क्र.८३१४ दि.२८/११/२०२५ ने प्राप्त झाला. अपिलार्थी यांनी, सदर मूळ माहिती अर्जाच्या अनुषंगाने श्री.सचिन उतळे ,मानीव जनमाहिती अधिकारी तथा अतिक्रमण

निरीक्षक यांनी अपिलार्थी यांना , इकडील कार्यालयाचे जा.क्र. ६४८३ दि.२४/१२/२०२५ रोजी माहिती पाठविण्यात आली. तथापि सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती अपुरी आहे असे कारण नमूद करून दि. २७/०१/२०२५ रोजी मा.प्रथम अपिल अधिकारी तथा महापालिका सहा.आयुक्त ,येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय यांच्याकडे सदरचा अपील अर्ज दाखल केला. सबब ,सदर प्रथम अपील अर्जावर दि.२६/०२/२०२६ रोजी अपिलार्थी यांचे म्हणणेनुसार प्रत्यक्ष सुनावणी आयोजित करण्यात आली . सदर सुनावणीस अपिलार्थी हे प्रत्यक्ष उपस्थित होते. श्री,राजेश खुडे . जनमाहिती अधिकारी तथा क्षेत्रीय अतिक्रमण अधिकारी तसेच श्री.सचिन उतळे ,मानीव जनमाहिती अधिकारी तथा अतिक्रमण निरीक्षक उपस्थित होते .

प्रथम अपील सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी आपले म्हणणे सादर केले. अपिलार्थी यांच्या म्हणणेनुसार त्यांनी मूळ अर्जामध्ये नमूद केलेली माहिती अपुरी असून , मूळ अर्जात नमूद केलेल्या मुद्दा क्र.४ ची विस्तृत माहितीचा तपशील नाही देण्यात आला नाही . श्री,राजेश खुडे . जनमाहिती अधिकारी तथा क्षेत्रीय अतिक्रमण अधिकारी यांनी आपले म्हणणे सादर केले की सदर मूळ अर्जात नमूद केलेल्या मुद्दा क्र.४ ची माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने अपिलार्थी यांना इकडील कार्यालयाचे पत्र जा.क्र ६४८३ दि.२४/१२/२०२५ अन्वये मागणी केलेल्या माहितीसाठी, प्रती पान रु. ०२/- प्रमाणे कार्यालयीन वेळेत माहिती देण्यात येईल असे कळविले होते. तसेच अपिलार्थी यांनी उपलब्ध माहितीचे अवलोकन करावे आणि मागणी केलेली माहिती चिन्हांकित करून द्यावी . त्यामुळे त्यांना प्रती पान रु.२/- प्रमाणे माहिती देण्यात येईल.

अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा आशय लक्षात घेता, मी प्रथम अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहा.आयुक्त ,येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय , पुणे महानगरपालिका, मला केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रस्तूतच्या अपिलात पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. सदर अपिलाच्या अनुषंगाने पुढील आदेश देण्यात येत आहेत:-

जनमाहिती अधिकारी तथा क्षेत्रीय अतिक्रमण अधिकारी यांनी मूळ अर्जात मागणी केलेल्या मुद्दा क्र ४ ची माहिती, अपिलार्थी यांना अवलोकना पश्चात , त्यांना कळविण्यात आलेल्या शुल्का प्रमाणे ,०८ दिवसात द्यावी.

***सदरचे अपील हे आज रोजी निकाली काढण्यात येत आहे.***

2. सदर माहितीने आपले समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे ४११००१ यांचेकडे द्वितीय अपील करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे

Rajesh

(राजेश गुर्रम )
प्रथम अपील अधिकारी तथा
प्र.महापालिका सहाय्यक आयुक्त
येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका

प्रत- १. श्री.सचिन उतळे ,सहा. जनमाहिती अधिकारी तथा अतिक्रमण निरीक्षक, येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका

येरवडा-कळस-धानोरी क्षेत्रीय कार्यालय,पुणे महानगरपालिका
पत्ता-सरगम हॉटेल समोर, गुंजन चौक येरवडा, पुणे ४११००६.
दुरध्वनी क्र.०२०२५५०९१००/९१०८/९१०९
ई.मेल :- yerwada@punecorporation.org
जा.क्र.- ८६०७ दिनांक:- २१/३/२६

**अपील अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय**
**प्रथम अपील क्रमांक :- ०२/२०२६,०३/२०२६, व ०४/२०२६**

प्रती,
**श्री .अविनाश रामचंद्र रिठे**
रिठे हाउस, डावखरे बिल्डींग,जाधव वस्ती
कळसगाव,आळंदी मार्ग,
पुणे ४११०१५.
मो नं :- ९९२१०४९५०९

**अपिलार्थी**

**विरुद्ध**

**जनमाहिती अधिकारी तथा.उप अभियंता**
येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका

---

माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपील

**श्री . अविनाश रामचंद्र रिठे** (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील), रिठे हाउस, डावखरे बिल्डींग, जाधव वस्ती कळसगाव,आळंदी मार्ग,पुणे ४११०१५. यांचा माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत केलेले अपील अर्ज, पुढील तक्त्यात (माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९(१) अन्वये प्रथम अपील) नमूद दिनांकास येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालयास प्राप्त झाले.

जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी मूळ माहिती अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा तपशील

| अपील क्र. | मूळ माहिती अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झालेचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
|---|---|---|---|---|---|
| ०२/२०२६ | ०२/०१/२०२६ | ०५/०१/२०२६ | ०५/०२/२०२६ | | |
| ०३/२०२६ | १२/०१/२०२६ | २२/०१/२०२६ | २२/०२/२०२६ | | - |
| ०४/२०२६ | ०५/०१/२०२६ | २२/०१/२०२६ | २२/०१/२०२६ | जा.क्र.७६०८ दि .२९/०१/२०२६ | |

अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

| अपील क्र. | अपील अर्जाचा दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झालेचा दिनांक | अपील दाखल करावयाचा अंतिम दिनांक | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? |
|---|---|---|---|---|---|
| ०२/२०२६ | ०७/०२/२०२६ | ०९/०२/२०२६ | ०५/०३/२०२६ | होय | |
| ०३/२०२६ | ०७/०२/२०२६ | ०९/०२/२०२६ | २२/०३/२०२६ | होय | |
| ०४/२०२६ | ०७/०२/२०२६ | ०९/०२/२०२६ | २२/०३/२०२६ | होय | |

अपिलार्थी यांनी मूळ अर्जात येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय नामांतर करण्याबाबत पुणे मनपातील माननीय अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनावरील कार्यवाहीच्या तपशिलाबाबत माहितीची मागणी केली होती . इकडील कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या माहिती अर्जास (अपील क्र. ०३/२०२६) माहिती देण्यात आली तसेच इतर माहिती अर्जांना

(अपील क्र. ०२/२०२६ व ०४/२०२६ ) पत्रव्यवहार करण्यात आला नाही . अपिलार्थी यांनी सदर माहिती अर्जामध्ये मागणी केलेली माहिती, हेतुपुरस्सर दिली नाही असे कारण नमूद करून , (अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले) वरील तक्त्यात नमूद दिनांकांना प्रथम अपील अर्ज, मा.प्रथम अपिल अधिकारी तथा महापालिका सहा.आयुक्त ,येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय यांच्याकडे दाखल करण्यात आले. . सदर प्रथम अपील अर्जा वर दि. २६/०२/२०२६ रोजी गुगल मिटद्वारे सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी गुगल मिटद्वारे उपस्थित होते. श्री.चंद्रसेन नागटिळक , जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, तसेच श्री.माधुरी ठोंबरे ,सहा. जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय सुनावणीस उपस्थित होते.

## विवेचन

प्रथम अपील सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी आपले म्हणणे सादर केले. अपिलार्थी यांना मूळ माहिती अर्जाच्या अनुषंगाने योग्य ती माहिती भेटली नाही. सदर माहिती मिळविण्यासाठी त्यांनी स्मरणपत्रे पाठविली परंतु विहित वेळेत माहिती देण्यात आली नाही . तसेच संबधित जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही म्हणून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व मूळ अर्जात मागणी केलेली माहिती देण्यात यावी.

श्री.चंद्रसेन नागटिळक , जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी आपले म्हणणे सादर केले की अपिलार्थी यांनी दिलेल्या निवेदनाचा विषय एकच असल्या कारणामुळे त्यांना जा.क्र.७६०८ दि .२९/०१/२०२६ ने कळविण्यात आले.तसेच सदर माहिती अर्जातील विषय नीतिगत व धोरणात्मक असल्यामुळे सदर बाबींचा निर्णय वरिष्ठ पातळीवरील निर्णय घेतला जाईल. क्षेत्रीय कार्यालयाच्या स्तरावर सदर विषयाच्या अनुषंगाने प्रस्ताव तयार करून वरिष्ठ पातळीवर सादर करण्यात येईल.

अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा आशय लक्षात घेता, मी प्रथम अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहा.आयुक्त ,येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय , पुणे महानगरपालिका, मला केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रस्तुतच्या अपिलात पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. सदर अपिलाच्या अनुषंगाने पुढील आदेश देण्यात येत आहेत:-

१. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी ३० दिवसात प्रस्ताव तयार करून वरिष्ठ पातळीवर सादर करावा व अपिलार्थी यांना सदर कार्यवाहीची माहिती द्यावी.

२. सहा. जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता यांनी अपिलार्थी यांना विहित मुदतीत माहिती का दिली नाही ? या बाबत खुलासा १५ दिवसात सादर करावा.

***सदरचे अपील हे आज रोजी निकाली काढण्यात येत आहे.***

२. सदर माहितीने आपले समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे ४११००१ यांचेकडे द्वितीय अपील करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे

Rajesh

(राजेश गुर्रम)
प्रथम अपील अधिकारी तथा
प्र.महापालिका सहाय्यक आयुक्त
येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका

प्रत :

श्री.माधुरी ठोंबरे,सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता ये.क.धा.क्षेत्रीय कार्यालय,पुणे मनपा,

येरवडा-कळस-धानोरी क्षेत्रीय कार्यालय,पुणे महानगरपालिका
पत्ता-सरगम हॉटेल समोर, गुंजन चौक येरवडा, पुणे ४११००६.
दुरध्वनी क्र.०२०२५५०९१००/९१०८/९१०९
ई.मेल :- yerwada@punecorporation.org
जा.क्र.- ८६६७ दिनांक:- २।३।२६

**अपील अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय**
**प्रथम अपील क्रमांक :- ०५/२०२६**

प्रती,
**श्री .अविनाश रामचंद्र रिठे**
रिठे हाउस, डावखरे बिल्डींग,जाधव वस्ती
कळसगाव,आळंदी मार्ग,
पुणे ४११०१५. **अपिलार्थी**
मो नं :- ९९२१०४९५०९

**विरुद्ध**

**जनमाहिती अधिकारी तथा.उप अभियंता**
येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका

---

<u>माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपील</u>

**श्री . अविनाश रामचंद्र रिठे** (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील), रिठे हाउस, डावखरे बिल्डींग, जाधव वस्ती कळसगाव,आळंदी मार्ग,पुणे ४११०१५. यांचा माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दाखल केलेला प्रथम अपील अर्ज , (माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९(१) अन्वये प्रथम अपील) आ. क्र ११८८० दि. ०९/०२/२०२६ रोजी येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालयास प्राप्त झाला .

<u>जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी मूळ माहिती अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा तपशील</u>

| **मूळ माहिती अर्जावरील दिनांक** | **अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झालेचा दिनांक** | **माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक** | **अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दिनांक** | **विलंब दिवस** |
|---|---|---|---|---|
| ०२/०१/२०२६ | ०५/०१/२०२६ | ०५/०२/२०२६ | | - |

<u>अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.</u>

| **अपील अर्जाचा दिनांक** | **अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झालेचा दिनांक** | **अपील दाखल करावयाचा अंतिम दिनांक** | **अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ?** | **अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ?** |
|---|---|---|---|---|
| ०७/०२/२०२६ | ०९/०२/२०२६ | ०५/०३/२०२६ | होय | |

अपिलार्थी यांनी मूळ अर्जात मा. श्री. राजेश गुर्रम साहेब मा. महा.सहा. आयुक्त, येरवडा क.धा,क्षे.कार्यालय पुणे मनपा यांना दि.०१/११/२०२५ रोजी पुणे मनपा प्रभाग क्र २ येथील येरवडा पोस्ट ऑफिस समोर स्वच्छतागृह बांधणेबाबत अर्ज देण्यात आला होता . सदर अर्जावरील अभिप्राय व कार्यवाहीचा तपशिलाबाबत माहितीची मागणी केलेई होती. इकडील कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या माहिती अर्जास श्री.चंद्रसेन नागटिळक , जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी जा.क्र ७४२८ दि. २१/०१/२०२६ रोजीचे पत्राने माहिती देण्यात आली . अपिलार्थी यांनी सदर माहिती अर्जामध्ये मागणी केलेली माहिती, हेतुपुरस्सर दिली नाही असे कारण नमूद करून , (अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९(१)

अन्वये प्रथम अपील दाखल केले) सदर प्रथम अपील अर्ज, मा.प्रथम अपिल अधिकारी तथा महापालिका सहा.आयुक्त ,येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय यांच्याकडे दाखल करण्यात आले. . सदर प्रथम अपील अर्जा वर दि. २६/०२/२०२६ रोजी गुगल मिटद्वारे सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी गुगल मिटद्वारे उपस्थित होते. श्री.चंद्रसेन नागटिळक , जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, तसेच श्री.माधुरी ठोंबरे ,सहा. जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय सुनावणीस उपस्थित होते.

## विवेचन

प्रथम अपील सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी आपले म्हणणे सादर केले. अपिलार्थी यांना मूळ माहिती अर्जाच्या अनुषंगाने योग्य ती माहिती भेटली नाही. तसेच तकलादू स्वरुपाची माहिती देण्यात आली आहे. सदर माहिती मिळविण्यासाठी त्यांनी स्मरणपत्रे पाठविली परंतु संपूर्ण माहिती देण्यात आली नाही . तसेच संबधित सहा.जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीपत्रात चुकीच्या पद्धतीने माहिती दिली आहे. म्हणून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व मूळ अर्जात मागणी केलेली माहिती देण्यात यावी.

श्री.चंद्रसेन नागटिळक , जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी आपले म्हणणे सादर केले की मूळ अर्जात नमूद केलेल्या विषयासाठी मनपाच्या सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकामध्ये नागरिक सहभाग अंतर्गत तरतूद करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे . तसेच सदर स्वच्छतागृहाचे काम अंदाजपत्रकाच्या अंतिम मान्यतेनंतर लगेच सुरु करण्यात येईल..

अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा आशय लक्षात घेता, मी प्रथम अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहा.आयुक्त ,येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय , पुणे महानगरपालिका, मला केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रस्तूतच्या अपिलात पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. सदर अपिलाच्या अनुषंगाने पुढील आदेश देण्यात येत आहेत:-

१. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी सदर विषयाच्या अनुषंगाने अद्यावत माहिती १५ दिवसात द्यावी.

२. सहा. जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता यांनी अपिलार्थी यांना पाठविलेल्या माहितीपत्रात योग्य त्या माहितीचा तपशील का नमूद का केला नाही ? या बाबत खुलासा १५ दिवसात सादर करावा.

*सदरचे अपील हे आज रोजी निकाली काढण्यात येत आहे.*

२. सदर माहितीने आपले समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे ४११००१ यांचेकडे द्वितीय अपील करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे

Rajesh

(राजेश गुर्रम)
प्रथम अपील अधिकारी तथा
प्र.महापालिका सहाय्यक आयुक्त
येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका

प्रत :

श्री.संदेश तेली ,सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता ये.क.धा.क्षेत्रीय कार्यालय,पुणे मनपा,